# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## युवा व इको क्लब

**उद्देश -** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबईचे पत्र जा.क्र.मप्राशिप/सशि/नाविन्यपूर्ण उपक्रम/काअ/२०१९-२०/७२३ दि.२६ फेब्रुवारी २०२० व दि.जा.क्र.समग्र शिक्षा(माध्य.)नाविउ/काअ/२०१९-२०/२०४ दि.३ मार्च २०२० च्या पत्रान्वये विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आवडी निवडी , त्यांचेमधील नेतृत्वगुण , प्रतिभा आणि सर्जनशीलता यामध्ये वाढ,आत्मविश्वास,छंद आणि विविध कौशल्य विकसित करण्यासाठी युवा क्लब स्थापन करणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी खालीलप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | स्तर | एकक | शाळा संख्या | अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | ५००० | ३०४१ | १५२.०५ |
| २ | उच्च प्राथमिक | १०००० | ५५८ | ५५.८० |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक | १०००० | २८ | २.२८ |

सदर तरतूद फक्त शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी मंजूर आहे.क्लबसाठी निश्चित केलेली तरतूद विभाग/जिल्हा/तालुकास्तरावरुन खर्च करता येणार नाही. केंद्रांतर्गत शाळांनी केंद्रस्तरावर एकत्र येऊन संबंधित क्लब साठी लागणा-या तरतूदीचे क्लब निहाय सूक्ष्म नियोजन करावे व मंजूर तरतूदीमध्ये केंद्रस्तरावर क्लब स्थापन करुन त्याची मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करावी. एका क्लब मध्ये कमीत कमी ११ व जास्तीत जास्त कितीही सदस्य राहू शकतील. प्रत्येक क्लबसाठी स्वतंत्र समिती करावी. समितीचे प्रमुख व सचिव आणि बाकी सर्व सदस्य अशी रचना असावी. युवा व इको क्लब खालीलप्रमाणे -

- वादविवाद क्लब
- कला आणि संस्कृती क्लब
- पुस्तक वाचन क्लब
- क्रीडा क्लब